**<u>निशाणी क्र. ८</u>**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की –

माझे नांव – **नितीन सुभाष काकडे**

वय सुमारे – ३८ वर्षे , व्यवसाय – उप अभियंता

निवासस्थान – लक्ष्मीनगर वडगाव चंद्रपूर, तह. जि. चंद्रपूर.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे श्री ए.एफ. फुलझेले अति.सरकारी अभियोक्ता.</u>**

०१. दिनांक ०९/०२/२०२४ रोजी मी सहायक अभियंता म्हणून जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उप विभाग, भद्रावती येथे कार्यरत होतो. त्यादिवशी मला पंच म्हणून हजर राहण्याकरिता सुचनापत्र प्राप्त झाले होते. आता मला सुचनापत्र दाखवण्यात आले. ते तेच असून त्यास **<u>नि.क्र.९</u>** देण्यात येते. सुचनापत्र मिळाल्यानंतर मी पो.स्टे. ला गेलो. पो.स्टे.मधून मला फुकटनगर, भद्रावती येथे घटनास्थळावर पोलिस घेवून गेले. त्यावेळी माझ्यासोबत माझ्या कार्यालयातील मेश्राम हे सुध्द हजर होते. घटनास्थळावर पिडीता आणि तिची आई हजर होती. पोलिसांनी त्यांना विचारपूस करुन त्यठिकाणचा पंचनामा केला आणि घटनास्थळावील साहित्य जप्त केले. घटनास्थळावर पिडीताने एक खाट दाखवली. खाटेवर एक उशी होती व त्याखाली एक चाकू होता. तो चाकू पोलिसांनी जप्त केला. आता मला घटनास्थळाचा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **<u>नि.क्र.१०</u>** देण्यात येते. पोलिसांनी अजुन त्याठिकाणी काय केले हे आठवत नाही.

०२. पोलिसांनी त्यादिवशी संध्याकाळी पुन्हा पो.स्टे. मध्ये बोलावले होते. मेश्राम हे माझ्यासोबत होते. पिडीतेने तिचे कपडे आणले होते. त्यामध्ये एक टी–शर्ट

आणि पॅन्ट होता. टी–शर्ट हा काळया रंगाचा होता. पॅन्ट हा काळया रंगाचा असून त्यावर पांढ–या पटटया होत्या. पोलिसांनी ते कपडे माझ्यासमक्ष जप्त केले. आता मला कपडे जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते. मला जर पिडीताचे कपडे दाखवले तर ते मी ओळखू शकतो. न्यायालयात सदर कपडे जमा नाही.

०३. हया व्यतिरिक्त अजुन कपडे किंवा ईतर साहित्य पोलिसांनी जप्त केले किंवा नाही हे मला आठवत नाही. आता मला जप्ती पंचनामे दाखवण्यात आले. त्यावर माझ्या सहया आहे. पंचनाम्याला **नि.क्र.१२ व १३** देण्यात येते. हे पंचनामे नेमके कशाबाबत होते हे मला आता आठवत नाही.

**साक्षीदाराचा उलट तपास घेण्याची परवानगी मागीतली. ती देण्यात आली.**

**उलट तपास सरकारी वकील श्री ए.एफ.फुलझेले.**

०४. हे खरे आहे की, घटनास्थळावर त्यावेळच्या कार्यवाहीचे फोटो सुध्दा काढण्यात आले. हे खरे आहे की, चारही फोटोमध्ये मी दिसत आहे. त्यास **आर्टीकल पी–१ ते पी–४** देण्यात येते. हे खरे आहे की, दिनांक ०९/०२/२०२४ रोजी पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीचा हाफ टी–शर्ट, नाईट फुल पॅन्ट आणि अंडरवियर जप्त केली होती आणि जप्ती पंचनामा नि.क्र.१२ तयार करण्यात आला. त्यावर माझी सही आहे. हे खरे आहे की, नि.क्र.१२ मधील मजकूर बरोबर आहे.

०५. हे खरे आहे की, त्याचदिवशी पोलिसांनी दोन सिलबंद शिशीमध्ये पोलिस शिपायापासून रक्ताचे नमुने जप्त केले. हे खरे आहे की, त्याप्रमाणे पोलिसांनी नि.क्र.१३ जप्ती पंचनामा तयार केला आणि त्यावर माझी सही घेतली. हे खरे आहे की, नि.क्र.१३ मधील मजकूर बरोबर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वि. ॲड. एस. एम. जिलटे .**

०६. माझे वरिष्ठ अधिकारी यांनी मला पंचनाम्यासाठी जाण्याबाबत पत्र दिले होते. पोलिसांनी माझ्या वरिष्ठांकडे पत्र दिले होते. सुचनापत्र नि.क्र.९ वर माझी सही नाही. हे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनाम्यावर माझ्या पो.स्टे.मध्ये सहया घेतल्या. हे मला आठवत नाही की, पोलिसांनी सर्व कार्यवाही केल्यानंतर मला कार्यमुक्त केल्याचे पत्र दिले नाही.

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलट तपास तहकूब.**

माझे समक्ष

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.08.01 17:15:08 +0530

**(अतुल के.शाह)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरोरा

दि.३१/०७/२६

**मध्यान्हानंतर उलट तपास शपथेवर पुन्हा सुरु :-**

**उलट तपास आरोपीतर्फे वि. ॲड. एस. एम. जिलटे .**

०७. आरोपीचे कपडे कोणापासून जप्त केले हे मला आठवत नाही. रक्ताचे नमुने आरोपीपासून जप्त करण्यात आले. हे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणत्याही वस्तु जप्त करण्यात आल्या नाही. हे खरे नाही की, मी फक्त पोलिसांच्या सांगण्यावरुन सहया केल्या. हे खरे नाही की, माझ्या वरिष्ठांनी मला पंच म्हणून जाण्याकरिता कोणतेही पत्र दिले नव्हते. माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला

नाही.  हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण.

फेर तपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.08.01 17:15:20 +0530

**(अतुल के.शाह)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरोरा

समक्ष,

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.08.01 17:15:24 +0530

**(अतुल के.शाह)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरोरा

दिनांक – ३१/०७/२०२६